दिनांक - 05 / 05/ 2026

विषय : पत्रकार नगर च्या नव्या गृह प्रकल्पात सभासदांना मिळणाऱ्या पार्किंग आणि त्याच्या वाटपा ची प्रक्रिया ठरविण्याकरिता झालेला मेळावा.

दिनांक 19/04/26 रोजी पार्किंग ह्या विषयावर झालेला प्राथमिक मेळाव्यात ठरल्या प्रमाणे दिनांक 04/05/2026 रोजी नव्या प्रकल्पात सभासदांना मिळणाऱ्या चारचाकी आणि दुचाकी वाहनांच्या सुधारित पार्किंग ची सविस्तर माहिती देण्या करिता तसेच पार्किंग चे वाटप (allotment) कसे करावे हे ठरविण्या करिता सभासदांचा मेळावा घेण्यात आला. ह्या मेळाव्याला 72 सभासद / सहसभासद उपस्थित होते.

संस्थेचे प्रकल्प सल्लागार श्री हर्षल कवडीकर यांनी पार्किंग च्या सुधारित drawings च्या मदतीने नव्या प्रकल्पात चारचाकी तसेच दुचाकी वाहनांची सोय 4 थरांमधे (4 parking floors -- P-4, P-3, P-2 and P-1) अशी असेल तसेच प्रत्येक फ्लोअर वर किती चारचाकी आणि दुचाकी गाड्या पार्क होऊ शकतील ते स्पष्ट केले.
1. P - 3 पार्किंग ची लेव्हल जवळपास ग्राउंड लेव्हल च्या समांतर असेल, तिथून रॅम्प वरून वर गेल्यावर P - 4 ची तसेच खाली गेल्यावर क्रमशः P - 2 आणि त्या खाली पी - 1 फ्लोअर ची पार्किंग असेल. Visitors आणि commercial पार्किंग वेगळ्या असतील.
2. P - 4, P - 3 आणि पी - 2 ह्या मजल्यावरील पार्किंग ही tendam पद्धतीची अर्थात एका मागे एक गाडी अश्या प्रकारे असेल तर पी - 1 थरा वरील पार्किंग ही एका बाजुला एक अशी असेल.
3. प्रत्येक कार ला 2.5 x 5.0 ,(2.5 x 10 मीटर दोन कार्स करिता) मीटर साइज चे पार्किंग असेल जे मोठ्या कार साठी ही sufficient आहे.
4. प्रकल्पात एकूण 675 कार्स आणि 693 दुचाकी वाहनांच्या पार्किंग ची सोय असणार आहे.
5. मागल्या मेळाव्यात सांगितल्या प्रमाणे P - 1 पार्किंग मधे पाणी शिरणार नाही ह्याची निर्धारित technical specifications प्रमाणे काळजी घेतली जाणार आहे. त्या बद्दल सभासदांनी काळजी करू नये.
6. पार्किंग कडे जाणारे सगळे रस्ते/ रॅम्प सहा मीटर रुंदी चे असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या कार्स ला त्रास होणार नाही.
7. P - 4 लेव्हल वर 89 tendam पार्किंग असतील. ह्यात 38 कार्स पार्किंग पैकी 12 x 2 अशा 24 कार्स डुप्लेक्स युनिट्स साठी असतील.
8. P - 3 लेव्हल वर visitors साठी चारचाकी आणि दुचाकींसाठी पार्किंग ची व्यवस्था असेल. तसेच फास्ट इलेक्ट्रिक चार्जिंग ची पण व्यवस्था ह्या मजल्या वर असेल.
9. P - 2 लेव्हल वर समाज मंदिरा साठी राखीव पार्किंग असेल शिवाय इतर कार्स साठी ही पार्किंग च्या जागा असतील.
10. टॉवर 2 मधील सभासदास P - 4 वर चार, पी - 3 वर तीन आणि पी - 2 लेव्हल वर चार अशा 11 x 2 कार्स ची सोय असेल जी त्यांच्या करिता जवळ आणि सोई चीअसेल.
11. स्प्लिट युनिट्स (43 नंबर) घेणाऱ्या सभासदांसाठी बाजू बाजूला अश्या 43 x 2 गाड्यांची सोय P - 1 लेव्हल वर असेल. ही सोय ह्या कारणाने ने की जर त्या सभासदांना दुसऱ्या युनिट मधे भाडेकरू ठेवायचा असेल तसेच भविष्यात एक गाळा विकायचा असेल तर ते सोई चे होईल. जर ह्या सभासदांना tendam पद्धती चे पार्किंग हवे असेल तर ते तसे ही पार्किंग P - 4 किंवा P - 3 लेव्हल वर घेऊ शकतील.
13. सिंगल युनिट्स घेणाऱ्यांना P - 4 लेव्हल वर tendam पार्किंग उपलब्ध असतील.
14. विकलांग व्यक्तींकरिता पण दोन पार्किंग ची सोय लिफ्ट च्या जवळ करण्यात येईल.
15. प्रत्येक पार्किंग फ्लोअर वर ड्रायव्हर्स करिता रेस्ट रूम / वॉश रूम्स देण्यात आल्या आहेत. तसेच कार

वॉश ची drainage out let  पण सोय असणार आहे ज्यात drainage outlet ची सोय पण असेल.
16. एखाद दुसरा अपवाद सोडला तर अधिकांश पार्किंग जोडी जोडी नेच असणार आहेत.
17. Visitor's parking UDCPR च्या norms प्रमाणे असणार आहे.
18. Driving ची सुलभता असावी म्हणून पुरत्या पार्किंग एरिया मधे Sinages देण्यात येतील.
19. ह्या नंतर श्री कवडीकर यांनी सभासदांच्या प्रश्नांना उत्तरं दिली. ह्यात प्रश्नोत्तरात श्री दिलीप पटवर्धन, श्री अनिल टाकळकर, श्री राजीव साबडे, श्री अरविंद करंदीकर, श्रीमती आभा वांबूरकर. श्रीमती निर्मला सावदेकर, श्री भूषण तळवलकर आदींनी त्यांचे प्रश्न विचारले.
20. संस्थे चे सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी येत्या 10 तारखे ला प्रायोजित विशेष सर्वसाधारण सभे मधे पार्किंग चे allotment 4 झोन मधे आणि चिठ्ठी टाकून लॉटरी पद्धती ने कशी होईल ते सांगितले. चार झोन म्हणजे पहिले डुप्लेक्स युनिट्स मग टॉवर दोन मधील 11 सभासद त्यानंतर स्प्लिट युनिट्स धारक आणि शेवटी एकाला एक युनिट धारक असा क्रम असेल. चार चाकी आणि दुचाकी दोन्ही प्रकार च्या वाहनां साठी अशीच प्रक्रिया असेल. पार्किंग चे फायनल ड्रॉइंग सभासदांच्या पाहणी साठी सोसायटी ऑफिस मधे ठेवण्यात येतील. सभासदांना ते निर्धारित वेळेत बघता येतील. पाहिले ते हॉल मधे लावण्याचे ठरले होते पण ते सोई चे होणार नाही म्हणून सोसायटी ऑफिस मधे ठेवण्याचे ठरले.
21. मेळाव्यात आपल्या विधी सल्लागार ॲड. श्रीमती काबरा यांनी सूचित केले की पुढील काही दिवसात Allotment letter चा ड्राफ्ट सभासदांना बघण्यासाठी देण्यात येईल जो पार्किंग चे ठरल्यानंतर त्या पुढील काही दिवसात पूर्ण भरून बिल्डर तर्फे पंच समिती च्या मार्फत सभासदांना देण्यात येईल. तसेच PAAA चा ड्राफ्ट पण पुढील दोन आठवड्यात सभासदांच्या माहिती साठी येण्याचा मानस आहे असे ही त्यांनी सांगितले.

शेवटी सचिव श्री पटवर्धन यांनी सर्वांचे आभार मानून मेळावा संपल्याचे जाहीर केले.

पंच समिती च्या वती ने